
ISSN2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# मराठी स्त्रीवादी कवितेवर जागतिकीकरणाच्या झालेल्या परिणामांचा विचार

प्रा. डॉ. संजय लांडगे
मराठी विभाग प्रमुख ,
अे.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.



## प्रस्तावना

जागतिकीकरण ही देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दूरगामी परिणाम करणारी एक महत्वपूर्ण घटना आहे. अर्थव्यवस्थेतील घसरण थांबविण्यासाठी १९९१ साली आपल्या देशाने मुक्त अर्थव्यवस्थेचा अवलंब करताना जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण ही त्रिसूत्री स्वीकारली, तेव्हा सुरुवातीला जागतिकीकरण ही प्रक्रिया निव्वळ आर्थिक असून देशाचे अर्थकारण आणि व्यापार एवढ्यापर्यंतच ती मर्यादित असेल, असा सर्वांचाच कयास होता. पण हळूहळू या प्रक्रियेने आपले व्यापक आणि व्यामिश्र स्वरूप दाखविण्यास प्रारंभ केला. या प्रक्रियेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापाराच्या देवाणघेवाणीबरोबरच तंत्रज्ञान, संस्कृती आणि भाषा यासारख्या घटकांचेही अभिसरण घटू लागले. भारतीय बाजारपेठ खुली झाल्यामुळे देशामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या वाढली, त्यातून निर्माण झालेल्या माल संस्कृतीमुळे चंगळवाद फोफावला. सायबर विश्वाच्या वाढत्या प्राबल्यामुळे इंग्रजी भाषा जीवनव्यवहाराच्या केंद्रस्थानी आली. मराठी भाषेची पिछेहाटही लागली. महानगराचा औद्योगिक विकास होऊन तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण होऊ लागले. खेडी ओस पडू लागली. पाश्चात्य जीवनशैलीने नव्या पिढीला भुरळ पाडली आणि पारंपारिक मूल्यव्यवस्था धोक्यात आली.

वर्तमानाला प्रतिक्रिया देण्याचा साहित्याचा, स्वभाव असल्याने जागतिकीकरणामुळे घडून आलेल्या या स्थित्यंतराचे पडसाद मराठी साहित्यामध्ये उमटलेले दिसतात. विशेषत: १९९० नंतरच्या काळातील कथा, कादंबरी, कविता आणि नाटक या साहित्यप्रकारांमध्ये जागतिकीकरणाचे संदर्भ काही प्रमाणात आढळतात. प्रामुख्याने कविता हा साहित्यप्रकार इतर प्रकारांपेक्षा या प्रक्रियेला अधिक भिडलेला जाणवतो. जागतिकीकरणाच्या परिणामांचे चित्रण करणारी कविता आज मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसते.

## जागतिकीकरण : संकल्पना आणि स्वरूप

जागतिकीकरणाची संकल्पना आपल्या देशासाठी नवी नाही. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी ‘हे विश्वची माझे घर’ अशा शषत एक प्रकारे जागतिकीकरणाचे सूतोवाच केलेले दिसते. वसुधैव कुटुंबकम, विश्वनीड, विश्वग्राम यासारख्या संकल्पना फार पूर्वी आपल्या देशामध्ये मांडल्या गेलेल्या दिसून येतात. स्थूलमानाने जागतिकीकरण म्हणजे जागतिक होणे विविध संदर्भांनी जगाशी जोडले जाणे. परंतु खोलवर पाहिल्यानंतर लक्षात येते की, जागतिकीकरणाची संकल्पना इतकी सोपी नाही. तिचे स्वरूप अत्यंत व्यामिश्र असल्याचे दिसून येते. या संकल्पनेला अनेक पैलू असल्याचे दिसतात.

## जागतिकीकरण आणि स्त्रीवादी कवितेतून व्यक्त झालेले स्त्रीजीवन

जागतिकीकरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घटिताचा मराठी कवितेवर वेगवेगळ्या प्रकारे मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे. जागतिकीकरणामुळे आपल्याकडील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये एकूणच जगण्याच्या शैलीमध्ये मूल्यदृष्टीमध्ये गेली वीसेक वर्षे जे लक्षणीय स्वरूपाचे बदल झाले आहेत, त्याला मराठीतील नव्वदनंतरच्या वेगवेगळ्या कवींनीही जागतिकीकरणाच्या संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत, उदाहरणार्थ, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ, भुजंग मेश्राम प्रभृती कवी.

मराठीतील काही कवी–कवयित्रींनी मात्र या व्यवस्थेला जमेल त्या प्रकारे विरोध करण्याचा, व्यवस्थेशी संघर्ष करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कविता याच या व्यवस्थाविरोधाचे प्रतीक आहेत. त्यामधून व्यवस्थाविरोधाचा सूर स्पष्टपणे दिसून येतो. मुख्यत्वे दलित आणि स्त्रीवादी कवितेने हा विरोध केला आहे. या सगळ्या बदलांना आक्रमकपणे नकार देणारा, हे सारे थोपवायला हवे. या व्यवस्थेशी संघर्ष करायला हवा, ही जाणीव बाळगणारा दलित व स्त्रीवादी कवी–कवयित्रींचा हा गट या ना त्या प्रकारे कृतीशीलतेशी चळवळींशी संबंधित आहे. या कवी–कवयित्रींनी प्रस्तुत काळात लक्षणीय कविता लिहिली आहे. जागतिकीकरणाच्या संदर्भातील मराठी कवितेची ही तिसरी प्रतिक्रिया म्हणता येईल. उदाहरणार्थ अरूण काळे, महेंद्र भवरे, नीरजा प्रज्ञा दया पवार प्रभृती कवी–कवयित्री.

विशेष म्हणजे समकालीन कवितेतील हे दोन्ही प्रवाह जागतिकीकरणाच्या कोलाहलातही आपल्या अस्मितेला जपण्याचा प्रयत्न करतात. आधीच शोषणाचा अनेक प्रकारचा अनुभव घेत असताना या नव्या आक्रमक व्यापारी संस्कृतीची त्यात लक्षणीय स्वरूपाची भर पडल्याची जाणीव येथे आहे. या व्यवस्थेचा दंभस्फोट करण्याचे, तिच्यातील विसंगती अंतर्विरोध उघड करण्याचे प्रयत्न दलित आणि स्त्रीवादी कविता करताना दिसते. सत्तरनंतरच्या दलित चळवळींच्या तपशीलामधून बाहेर पडून केवळ एका विशिष्ट परंपरेतील मूल्यहीन इतिहासच नव्हे, तर एकूणच शोषणाच्या इतिहासाला परपंरेला शोषणाच्या सर्वव्यापी प्रक्रियेलाच नकार देण्याचा प्रयत्न येथे दिसतो. दलित कवितेच्या दृष्टीने जागतिकीकरणाची व्यवस्था पारंपारिक वर्णव्यवस्थेचे प्रतीक होते. स्त्रीवादीही पुरूषसत्ताक व्यवस्थेतील शोषणाच्या प्रक्रियेला नकार देताना दिसतात. किंबहुना जागतिकीकरणाची प्रक्रिया त्यांच्याही दृष्टीने पुरूषसत्ताक व्यवस्थेचे प्रतीक होत. या नकाराच्या प्रेरणेतूनच हे दोन्ही प्रवाह आपल्या परंपरेचे, संस्कृतीचे आणि एकूणच मानवी संस्कृतीचे आणि पुनर्वाचन करण्याचे प्रयत्नही करताना दिसतात.

मुख्यत्वे दलित व स्त्रीवादी कवी–कवयित्रींचा समावेश होतो. या कवी–कवयित्रींचा अनेक प्रकारे कृतीशीलतेशी, चळवळींशी संबंध असल्याचे आधी सांगितले आहेच. त्यामुळे या कवींचा जागतिकीकरणाला होणारा विरोध तीव्र स्वरूपाचा, आक्रमक असणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणाला विरोध करताना या गटातील कवी–कवयित्रींनी अनेक जाणिवा व्यक्त केल्या आहेत. त्यातील एक महत्वाची जाणीव वस्तूकरणाची, वस्तूंचे आक्रमणामुळे अस्तित्व घेरले गेल्याची आहे. ही आधुनिकवादी परंपरेतील आहे. काही स्त्रीवादी कवयित्रींच्या कवितेतूनही वस्तूंच्या आक्रमणाची, वस्तूकरणाची चिंता व्यक्त झाली आहे. नीरजा, प्रज्ञा, दया पवार यांच्या कवितेत ही चिंता वेदना व्यक्त झाली आहे. कवयित्री नीरजाला माणसांचेच वस्तुकरण कसे होत आहे याचे चित्र दिसते. ती म्हणते : शॉपिंग मॉल्स वाहताहेत. ओसंडून माणसं चकचकीत फरशीसारखी घरंगळताहेत. स्वत:वरून डिस्काऊंटची पाटी गळ्यात अडकवून हातोहात विकली जाताहेत माणसं. (नीरजा २०१० : १२१)

वस्तुकरणाच्या संदर्भात प्रज्ञा दया पवार म्हणतात, ''कुठल्या काऊंटरवर ठेवलीय माझी कविता डिस्काऊंटमध्ये विक्रीला !'' (प्रज्ञा दया पवार, २००९ : ५७) आपल्या कवितेचेही पर्यायाने आपल्या आंतरिकतेचेही वस्तूकरण होते आहे. ही भीती येथे आहे. बाजारपेठेने आपल्याला वेढले आहे. सर्वच गोष्टींचे कलेचेही रूपांतर बाजारपेठेत होत आहे, असे पवारांना दिसते. विठाबाई नारायणगावकर या लावणीसम्राज्ञीवर लिहिताना या नव्या व्यवस्थेत अस्सल कला, कलावंत हेही बाजूला पडत आहे, त्यांना नष्ट केले जात आहे आणि फसवी, नटवी कला महाकाय ग्लोबल स्क्रीनवरून समोर येत असल्याची जाणीवही कवयित्री व्यक्त करते. ती म्हणते : नवभांडवलशाहीचा हा कराल वरवंटा फिरतोय तु. या अस्सल नितांत नितांत रंगावर बहिष्कृतांच्या रंग–विधानावर (प्रज्ञा दया पवार २००९ : ४०)

बाजारपेठेच्या आक्रमणामुळे एकूणच आहेरे वर्गाचा चंगळवाद कसा वाढला आहे, भोगवादी वृत्ती कशी प्रबळ झाली आहे याचेही चित्रण काही कवी–कवयित्रींच्या कवितेत झाले आहे. उदाहरणार्थ, नीरजा म्हणते, 'माणसांना आजार झालाय

ग्लोबलायझेशन नावाची साथ पसरतेय वेगानं...... भोगू पाहतात वाट्याला आलेला प्रत्येक क्षण मल्टिप्लेक्स किंवा डिस्कोथेकच्या थांब्यावर माणसं स्वत:च झाली आहेत प्रचंड शॉपिंग माल चकचकीत (नीरजा २०१० : १२१–२२)

स्त्रीवादी कवयित्रींची एक स्त्री म्हणून जागतिकीकरणाला झालेली प्रतिक्रिया कोणत्या स्वरूपाची आहे. ह्या कवयित्रीसमोर प्रश्न आहेत की, जागतिकीकरणाच्या परिस्थितीने स्त्री–पुरूष संबंधामध्ये, पुरूषसत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात फरक पडला का ? या बदललेल्या काळात समानता आली आहे का स्त्रीकडे आजही कोणत्या दृष्टीने पाहिले जाते इत्यादी याविषयी सर्वच कवयित्रींच्या लेखनात प्रत्यक्ष निर्देश येत नाहीत. परंतु अप्रत्यक्षपणे या काळातील बदलत जाणाऱ्या स्त्रीपुरूष नातेसंबंधाचे चित्र आपल्यासमोर ठेवले जाते.

जागतिकीकरणात स्त्रीपुरूष नात्याचे पुरूषाचे काही वेगळे चित्र समोर येते का, या प्रश्नाचे प्रज्ञा दया पवार यांचेही उत्तर नकारार्थी आहे. त्यांच्या कवितेतील ग्लोबल तिठ्यावर पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या नवी भाषा, नवी प्रतिके घडवणाऱ्या, नवा इतिहास घडवण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या तिला तद्दन जुन्याच पुरूषाला पर्यायच सापडत नाही. प्रज्ञा दया पवार (२००७ : ८–९) कवयित्रीला जग झपाट्याने बदलताना दिसते आहे. परंतु सत्तेच्या समीकरणांमध्ये मात्र बदल होत नाहीत. उलट ते बदल होत आहेत ते अमानुष स्वरूपाचे आहेत. कॅलेंडरची पाने फडफडताहेत. मॉलमध्ये परिवर्तित होताहेत. गावकुसं पितृसत्ता, जातसत्ता, वर्गसत्तेच्या जिवंत सांगाड्याला फुटताहेत. नवनव्या असह्य अमानुष पेशी (२००९ : ४३) कवयित्री अर्थातच केवळ पुरूषसत्तेविषयी बोलत नाही तर जात, वर्ग अशा एकूणच सर्व प्रकारच्या सत्ताविषयी बोलते.

नीरजा यांच्या कवितेत या व्यवस्थेत बाईचे पुरूषी सत्तेकडून वस्तूकरणही होत असल्याची जाणीव व्यक्त झाली आहे. कवयित्री म्हणते, या ग्लोबल गावातही विक्रीला काढलेल्या अनेक वस्तूंपैकी एक वस्तू बनवता आहात. बाईला आणि ज्याम मजा येते म्हणून आनंदाने साजरा करता आहात तुमचा पुरूषार्थ (नीरजा, २०१० :१५४) कवयित्रीला अशी पुरूषी सत्ता नाकारावयाची आहे. ती नव्या बंडखोर खऱ्याखुऱ्या ग्लोबल स्त्रीचे रूप आपल्यासमोर ठेवते. ग्लोबल सर्वार्थाने या कवितेत परंपरेतील पावित्र्य योनिशुचिता या कल्पनांना धुडकावून लावणारी, 'केवळ पुरूषाची अभिलाषा बाळगणारी, आपल्या ग्लोबल अस्तित्वाचा शोध घेऊ पाहणारी, संस्कृतीचे अर्थ बदलू पाहणारी स्त्री ही पहावयास मिळते. ती परंपरा पूर्णपणे नाकारू पाहते, सर्वार्थाने ग्लोबल होऊ पाहते. (नीरजा २०१०:११९–१०)

## जागतिकीकरणामुळे स्त्रीवादी कवितेच्या शैलीत झालेला बदल

जागतिकीकरणाचा प्रभाव टिपणारी नव्वदोत्तर मराठी कविता ही गंभीर स्वरूपाची आहे. आशयाबरोबरच आविष्कार तंत्राचाही ती अत्यंत सजगपणे विचार करताना दिसते. आधीच्या पिढीतील चित्रे कोल्हटकर, नेमाडे, ढसाळ यांचे बंडखोर संस्कार पचवल्यामुळे ती एकूणच कविता या साहित्य प्रकाराचा मोकळेपणाने विचार करताना जाणवते. पूर्वसुरीची सर्व लेखनविषयक बंधने झुगारून देवाच्या मानसिकतेतून ही कविता निर्माण झालेली दिसते. त्यामुळे ग्रामीण महानगरीय आणि दलित अशा तिन्ही प्रवाहातील जागतिकीकरणवादी कविता आविष्कार यंत्राच्याबाबतीत वैशिष्ट्यपूर्ण वाटते. ही कविता प्रयोगशीलता जोपासणारी आहे. म्हणूनच या कवितेने स्वत:ची अशी एक शैली निर्माण केल्याचे जाणवते.

भाषिक क्रीडन म्हणजे शषंची किरवा–किरव, नियमोल्लंघन, वक्रोक्ती, धृवात्मक मांडणी यातून आशयाला अधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न कवी–कवयित्री करताना दिसतात. पुराणकथांमधील मिथकांना, प्राक्कथांना आधुनिक परिभाषेत मांडण्याचा प्रयत्न काही कवी–कवयित्रींनी केलेला दिसून येतो. प्रमाणकांचे विपधन हाही जागतिकीकरणवादी कवितेचा एक शैलीविशेष सांगता येतो. ओवी–अभंगाची मोडतोड केशवसुत, मर्ढेकरांसारख्या कवींच्या कवितांचे विडंबन, लोकगीते, जानपद गीतांची मोडतोड अशा विभिन्न प्रकारांनी हे विपथन घडताना दिसते. नादानुकारी शषंचा वापर हाही जागतिकीकरणवादी कवितेचा एक शैलीविशेष जाणवतो.

थोडक्यात ग्रामीण, शहरी आणि दलित जीवनावरील जागतिकीकरणाचे परिणाम कवितेवरही झाला आहे. जागतिकीकरण ही देशाच्या विविध क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी महत्वपूर्ण घटना आहे. तिच्या परिणामांवर भाष्य करणारी कविता मराठीमध्ये मोठ्या प्रमाणावर लिहिली जात आहे.

## निष्कर्ष :

१) ही कविता समूहभावनेला अधिक प्राधान्य देणारी व जीवनसन्मुख असणारी आहे.

२) टिकून राहणे व संघर्ष करणे हा या कवितेचा गाभाभूत घटक आहे.

३) १९९० नंतरच्या कवितेने आधुनिक जीवनजाणिवांना अधोरेखित करताना उपरोध, उपहास यांना महत्व देऊन परंपरेविरूध्द विद्रोहही केला आहे.

४) नाट्यत्नकता, कथनात्मकता व संवादात्मकता हे या कवितेचे विशेष आहे.

५). बाजारपेठेच्या आक्रमणामुळे एकूणच आहेरे वर्गाचा चंगळवाद कसा वाढला आहे. भोगवादी वृत्ती कशी प्रबळ झाली आहे. याचेही चित्रण कवितेतून दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ–

१) आधुनिक मराठी ग्रामीण कविता– डॉ. सौ. गायकवाड हेमलता– फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती एप्रिल १९९७– पृष्ठ क्र. ७२

२) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता– प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ९ ऑगस्ट १९९९, पृष्ठ– २५०

३) मराठी दलित कविता– बी. रंगराव– साहित्य अकादमी नवी दिल्ली प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ– ६७

४) अंतस्थ लोखंडे प्रज्ञा मानसन्मान प्रकाशन, पुणे १९९३, पृष्ठ क्र. ५५